देशोन्नती

# मुख्यमंत्री वयोश्री योजनेला ज्येष्ठांचा प्रतिसाद

## 3470 नोंदणी अर्ज नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर जमा

देशोन्नती वृत्तसंकलन

**नागपूरः** ज्येष्ठ नागरिकांसाठी राज्य शासनाच्यावतीने सुरू करण्यात आलेल्या मुख्यमंत्री वयोश्री योजनेला शहरातील ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. नागपूर महानगरपालिकेच्या दहाही झोन निहाय असणाऱ्या ५१ नागरी प्राथमिकआरोग्य केंद्रांच्या माध्यमातून आजवर ३ हजार ४७० नोंदणी अर्ज प्राप्त झाले आहेत.

राज्यातील ६५ वर्ष वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी आणि त्यांना वयोमानपरत्वे येणाऱ्या अपंगत्व, अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक सहाय्य साधने/उपकरणे खरेदी करण्याकरीता तसेच मनःस्वास्थ्य केंद्र, योगोपचार केंद्र इ. द्वारे त्यांचे मानसिक स्वास्थ्य अबाधित ठेवण्यासाठी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.




अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनात शहरात मुख्यमंत्री वयोश्री योजना राबविण्यात येत आहे.

मनपाचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर यांनी सांगितले की, मुख्यमंत्री वयोश्री योजनेच्या अंतर्गत पात्र ज्येष्ठ लाभार्थ्यांना चष्मा, श्रवणयंत्र, ट्रायपॉड, स्टिक व्हील चेअर, फोल्डिंग वॉकर, कमोड खुर्ची, नि ब्रेस, लंबर बेल्ट, सर्वाइकल कॉलर इ. उपकरणे खरेदीकरिता थेट अर्थसहाय देण्यात येत आहेत. आशा सेविका या मुख्यमंत्री वयोश्री या योजनेचा महत्वाचा भाग असून, ६५ वर्षावरील पात्र लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळावा याकरिता घरोघरी जाऊन योजनेचा फॉर्म लाभार्थी यांना देत आहेत. मनपाच्या नागरी प्राथमिकआरोग्य केंद्रात नोंदणी अर्ज स्वीकारण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. प्राप्त अर्जानुसार युपीएचसीचे वैद्यकीय अधिकारी यांच्यामार्फत ज्येष्ठांची आरोग्य तपासणी केली जात आहे. प्राप्त अर्ज हे समाज कल्याण विभागाला वर्ग केले जात आहेत. मनपाच्या दहाही झोन निहाय असणाऱ्या ५१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून आजवर ३ हजार ४७० अर्ज प्राप्त झाले आहेत.